लोकमत

# लीलावती रुग्णालयामार्फत आता लवकरच कॅन्सर हॉस्पिटल

## जगप्रसिद्ध मेयो क्लिनिककडून नर्सिंग कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** कॅन्सरसारख्या दुर्धर आजारावर अत्याधुनिक उपचारासाठी वांद्रे येथील लीलावती रुग्णालयामार्फत ३०० खाटांचे भव्य कॅन्सर रुग्णालय उभारण्यात येणार आहे. या रुग्णालयातील नर्सिंग कर्मचाऱ्यांचे कौशल्य वाढवण्यासाठी अमेरिकास्थित जगप्रसिद्ध मेयो क्लिनिकचे सहकार्य घेण्यात येणार आहे.

**३००**
**बेडसह अत्याधुनिक सोयीसुविधा मिळणार**

या संदर्भात वांद्रे येथील जिओ सेंटर येथे घेतलेल्या कार्यक्रमात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंबकल्याण मंत्री प्रकाश आबिटकर, माहिती आणि तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, खा. डॉ. श्रीकांत शिंदे, मेयो क्लिनिकचे मुख्य कार्यकारी अधिकारी बिजू सॅमकुट्टी, लीलावती हॉस्पिटलचे विश्वस्त चारू मेहता, राजेश मेहता, प्रशांत मेहता, राजीव मेहता उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले, मेयो क्लिनिकसोबत उचललेले हे पाऊल हे भारतातील वैद्यकीय क्षेत्रात प्रगती घडवून आणेल. हे केवळ रुग्णालय नसून नागरिकांसाठी 'आरोग्य मंदिर' ठरेल. परिचारिकांना मेयो क्लिनिककडून विशेष प्रशिक्षण मिळणार असल्याने त्या जगातील सर्वोत्तम परिचारिका ठरतील.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वित्झर्लंडमधील दावोस येथून चित्रफितीद्वारे संदेश पाठवून लीलावती हॉस्पिटलचे अभिनंदन केले. या नवीन कॅन्सर केअर इन्स्टिट्यूटमध्ये कर्करोगाचे वेळीच आणि अचूक निदान व उपचार करण्यासाठी आणि मृत्युदर कमी करण्यासाठी एआय तंत्रज्ञानाची मदत घेतली जाणार आहे.